नोंदणी क्र. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ३१८ Issue - 318 | वार गुरुवार दि. ९ एप्रिल २०२६ Blow- Thursday Date 9 April 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# एसटी तिकिट दरात वाढ जाहीर

## उन्हाळ्यात प्रवाशांना झटका; ३० टक्क्यांपर्यंत झाली भाडेवाढ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : उन्हाळी सुट्टी सुरु झाली आहे आणि प्रत्येकजण आपल्या गावी किंवा बाहेरगावी जाण्यासाठी वेगवेगळ्या ठिकाणांचा शोध घेत आहेत. आता तिथे जाण्यासाठी सरकारी सुविधांचा वापर म्हणजे एसटी रेल्वे यांचा वापर केला जाणारच. पण ऐन उन्हाळ्याच्या सुट्टीवेळीच राज्य परिवहन मंडळाने एसटी भाडे वाढवले आहे.

भाडेवाढीमागील कारणे

उन्हाळी सुट्टीत प्रवाशांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढते. ग्रामीण भागात जाणाऱ्यांची संख्या जास्त असल्याने एसटी सेवेला मोठी मागणी असते. या पार्श्वभूमीवर हंगामी भाडेवाढ करण्याचा अधिकार एसटी महामंडळाला असून, त्यानुसार हा निर्णय घेण्यात आला आहे.

राज्य परिवहन प्राधिकरणाने डढ म हामंडळाला सणासुदीच्या आणि गर्दीच्या काळात ३० टक्क्यांपर्यंत भाडेवाढ करण्यास मंजुरी दिली आहे. मात्र यंदाच्या उन्हाळी हंगामासाठी १० टक्के भाडेवाढ लागू करण्यात आली आहे. ही वाढ १४ एप्रिलच्या मध्यरात्रीनंतर लागू होणार आहे.




एसटी स्थानके, बसगाड्या आणि आगार स्वच्छ ठेवण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला असल्याने प्रत्येक तिकिटावर २ रुपये स्वच्छता अधिभार आकारला जाणार आहे.

सवलतधारक आणि पासधारकांसाठीही अधिभार लागू महिला सन्मान योजना, ज्येष्ठ नागरिक आणि इतर सवलतध-ारक प्रवाशांनाही हा स्वच्छता अधिभार लागू असेल. त्यामुळे सर्व प्रवाशांवर या वाढीचा परिणाम होणार आहे. 'आवडेल तेथे प्रवास' योजनेअंतर्गत चार आणि सात दिवसांच्या पासवर ५ रुपये अधिभार आकारला जाणार आहे. मात्र आगाऊ आरक्षणातून घेतलेल्या पासवर हा अधिभार लागू नसेल. तसेच बस भाड्याने घेणाऱ्यांना प्रति बस ५० रुपये अधिभार द्यावा लागणार आहे.

प्रमुख मार्गांवरील नवे दर

भाडेवाढीनंतर काही महत्त्वाच्या म ार्गांवरील तिकिट दर पुढीलप्रमाणे असतील : परळ ते कोल्हापूर - ६४० ऐवजी आता ७०४ रुपये मुंबई ते कोल्हापूर - ७५० ऐवजी आता ८२५ रुपये मुंबई ते ला-तूर - ९०० ऐवजी १००० रुपये मुंबई ते रत्नागिरी - ६०० ऐवजी ७०० रुपये तिकीट दर असणार आहे. मुंबई ते पुणे - २८२ ऐवजी ३१४ तिकीट दर मुंबई ते नाशिक - ३२३ ते ३५९ रुपये मुंबई ते अलिबाग - १८२ ऐवजी २०४ रुपये मुंबई ते चिपळूण - ४५३ ऐवजी ५०२ रुपये

ही भाडेवाढ साधी बस, मिडी बस, जलद सेवा आणि रात्रसेवा देणाऱ्या गाड्यांसाठी लागू असेल. मात्र शिव-नेरी, शिवशाही, जनशिवनेरी, हिरकणी, शयनयान आणि ई-बस सेवांना या वाढीतून वगळण्यात आले आहे.

एकूणच, उन्हाळी सुट्ट्यांच्या काळात वाढलेली प्रवासी संख्या लक्षात घेता एसटी ने हा निर्णय घेतला असला, तरी या भाडेवाढीमुळे सर्वसामान्य प्रवाशांच्या खिशावर अतिरिक्त भार पडणार आहे.

# युद्धविरामानंतर काही तासांतच इराणच्या लावन बेटावरील तेल रिफायनरीवर हल्ला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

तेहरान : युद्धविरामाची घोषणा झाल्यानंतर अवघ्या काही तासांतच इराणच्या लावन बेटावरील तेल रिफायनरीवर हल्ला झाल्याची माहिती समोर आली आहे. इराणी सरकारी दूरदर्शनच्या हवाल्याने ही बातमी दिली आहे. अहवालानुसार, अग्निशमन दल आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न करत आहे. सुदैवाने या घटनेत कोणीही जखमी झालेले नाही. मात्र हा हल्ला नेमका कुणाकडून करण्यात आला, याबाबत अद्याप माहिती देण्यात आलेली नाही.



वृत्तानुसार, संयुक्त अरब अमिरातीने (यूएई) देखील सांगितले की, इराणकडून येणाऱ्या क्षेपणास्त्रांना प्रत्युत्तर देताना त्यांच्या हवाई संरक्षण प्रणालीने गोळीबार केला. युद्धविराम लागू असतानाही इराणने कुवैतमध्ये ड्रोन हल्ला केल्याची माहिती आहे. या हल्ल्यात तेल आणि वीज क्षेत्राशी संबंधित महत्त्वाच्या ठिकाणांना लक्ष्य करण्यात आले.

कुवैतच्या संरक्षण मंत्रालयाचे प्रवक्ते कर्नल सऊद अब्दुलअजीज अल-ओतैबी यांनी सांगितले की, पहाटे पाच वाजल्यानंतर इराणचे २८ ड्रोन पाडण्यात आले. त्यांनी हा हल्ला शत्रूकडून करण्यात आलेला मोठा आणि भीतीदायक हल्ला असल्याचे म्हटले. मोठ्या संख्येने ड्रोन पाठवण्यात आले होते, मात्र हवाई संरक्षण यंत्रणेने त्यांना रोखले. काही ड्रोन देशाच्या दक्षिण भागातील तेल प्रकल्प आणि वीज निर्मिती केंद्रांच्या दिशेने जात हो-ते, असा दावा त्यांनी केला. या हल्ल्यांमुळे तेल संरचना, वीज केंद्रे आणि पाणी प्रकल्पांचे मोठे नुकसान झाले आहे. दरम्यान, अमेरिका आणि इराण यांच्यात मंगळवार-बुधवारच्या मध्यरात्री दोन आठवड्यांच्या तात्पुरत्या युद्धविरामावर सहम ती झाली आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सतत इराणला कठोर इशारे देत असतानाच हा करार झाला. तीन दिवसांपूर्वी ट्रम्प यांनी कठोर शब्दांत इशारा देत म्हटले होते की, जर तेहरा-नने होर्मुज सामुद्रधुनी खुली केली नाही आणि अमेरिकेसोबत करार केला नाही, तर त्याचे गंभीर परिणाम होतील. ट्रम्प यांनी इशारा देताना सांगितले होते की, ७ एप्रिल रात्री ८ वाजेपर्यंत (भारतीय वेळेनुसार ८ एप्रिल सकाळी ५.३० वाजता) युद्ध सुरू होऊ शकते आणि अशा परिस्थितीत अमेरिका इराणमधील ऊर्जा प्रकल्प (पॉवर प्लांट्स) आणि पूल यांना लक्ष्य करेल.

# शस्त्रसंधीचा भंग होताच इराण भडकला, होर्मुझची सामुद्रधुनी बंद केली, थेट जहाजं उडवण्याची धमकी

नवी दिल्ली : अमेरिका आणि इराण यांच्यातील युद्ध शस्त्रसंधी झाल्यानं आखाती देशातील संघर्ष थांबल्याचं चित्र निर्माण झालं होतं.मात्र, इस्त्रायलकडून शस्त्रसंधीचं उल्लंघन करण्यात आल्यानं इराणकडून मोठा निर्णय घेण्यात आला आहे. इराणनं होर्मुझची सामुद्रध-ुनी बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळं जगभरातील ऊर्जासाधनांच्या पुरवठ्यावर परिणाम होऊन पुन्हा तणाव वाढण्याची शक्यता आहे.

फार्स वृत्तसंस्थेच्या माहितीनुसार इस्त्रायलकडून लेबनॉनमध्ये शस्त्रसंधीचं उल्लंघन केलं आहे. यामुळं इराणच्या नौदलानं होर्मुझची सामुद्रधुनी बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. होर्मुझची सामुद्रधुनी परवानगीशिवाय पार करु नये अशी धमकी देण्यात आल्याचं सांगण्यात येत आहे.

इराणकडून या सर्व घटनाक्रमानंतर जहाजम ालकांना इशारा देण्यात आलाय, परवानगीशिवाय जहाज होर्मुझमधून पार करण्याचा प्रयत्न करु नये. परवानगीशिवाय होर्मुझची सामुद्रधुनी पार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या जहाजांवर हल्ले करुन ती जहाजं नष्ट केली जातील. अमेरिका आणि इराण यांच्यात शस्त्रसंधी झाल्यानंतर परिस्थिती तणावपूर्ण आहे.

न्यूज एजन्सीनं दिलेल्या माहितीनुसार सागरी नियंत्रण संस्थेनं मरीन ट्रॅफिकच्या हवाल्यानं इराण आणि अमेरिका यांच्यातील सशर्त शस्त्रसंधी झाल्यानंतर केवळ दोन जहा होर्मुझची सामुद्रधुनी पार करु शकली आहेत. यामुळ होर्मुझच्या सामुद्रधुनी पार करण्यासाठी थांबलेल्या जहाजांची चिंता वाढली आहे.

अमेरिकेनं पूर्ण ताकद लावून देखील ४० दिवसांनंतर होर्मुझच्या सामुद्रधुनी खुली करण्यासाठी इराणला झुकवू शकला नाही. मात्र, अमेरिकेला शस्त्रसंधी करावी लागली. डोनाल्ड ट्रम्प यांनी वारंवार होर्मुझची सामुद्रधुनी खुली करणं प्राथमिकता असल्याचं म्हटलं.

डोनाल्ड ट्रम्प यांनी होर्मुझच्या सामुद्रधुनी केवळ २ मिनिटांमध्ये खुली करु असे दावे केले होते. शस्त्रसंधी जाहीर झाल्यानंतर परिस्थिती वेगळी पाहायला मिळत आहे. इराणनं त्यांच्या अटीवर होर्मुझची सामुद्रधुनी उघडली होती. आता पुन्हा सामुद्रधुनी बंद करण्यात आली आहे.

# राज्यातील ५१ तहसीलदार होणार उपजिल्हाधिकारी; महसूल विभागात हालचाली; 'एमपीएससी'ची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांची संधी हुकणार?



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्याच्या महसूल विभागात तहसीलदार संवर्गातील अधिकाऱ्यांना थेट उपजिल्हाधिकारी पदी पदोन्नती देण्याच्या हालचालींना वेग आला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांपूर्वी १०८ तहसीलदारांना पदोन्नती दिल्यानंतर, आता पुन्हा ५१ तहसीलदारांची उपजिल्हाधिकारी पदी वर्णी लागण्याची शक्यता आहे. मात्र, या मोठ्या प्रमाणावरील पदोन्नतीमुळे म हाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) माध्यमातून थेट उपजिल्हाधिकारी होण्याचे स्वप्न पाहणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये चिंतेचे वा-तावरण पसरले असून, त्यांच्या संधीवर गदा येण्याची भीती व्यक्त होत आहे.

तहसीलदार संवर्गातील ५१ अधिकाऱ्यांची पदोन्नतीने नियुक्ती करण्याचा प्रस्ताव महसूल विभागाने अंतिम टप्प्यात आणला आहे. लवकरच हा प्रस्ताव मुख्यमंत्री कार्यालयाच्या मान्यतेसाठी पाठवला जाणार आहे. राज्यात उपजिल्हाधिकारी संवर्गातील एकूण ६०० पदे मंजूर आहेत. सेवा प्रवेश नियमांनुसार, यातील ३०० पदे ही 'एमपीएससी'मार्फत थेट भरतीद्वारे, तर उर्वरित ३०० पदे पदोन्नतीने भरली जाणे बंधनकारक आहे. हा ५०-५० टक्क्यांचा समतोल राखणे आवश्यक असताना, प्रत्यक्षात पद-ोन्नतीचा कोटा पूर्ण भरलेला असतानाही नवीन नियुक्त्या केल्या जात असल्याची ओरड विद्यार्थ्यांकडून होत आहे. जर ही पदे पदोन्नतीनेच भरली गेली, तर आगामी काळात 'एमपीएससी'कडे या पदांची म ागणीच केली जाणार नाही, ज्यामुळे स्पर्धा परीक्षा देणाऱ्या उमेदवारांच्या जागा कमी होण्याचा धोका निर्माण झाला आहे.

राज्यात स्पर्धा परीक्षांचे वेळापत्रक आधीच विस्कळीत असल्याने विद्यार्थी हवालदिल आहेत. त्यातच महसूल विभागाने यापूर्वी १०८ जणांना दिलेल्या पदोन्नतीवर विद्यार्थ्यांनी तीव्र आक्षेप नोंदवला होता. आता पुन्हा ५१ पदांची प्रक्रिया राबवली जात असल्याने 'एमपीएससी'च्या माध्यम ातून होणाऱ्या थेट पदभरतीवर संक्रांत येईल, अशी भावना उमेदवारांमध्ये आहे.

महसूल विभागाच्या या प्रस्तावाम ुळे प्रशासकीय स्तरावर हालचाली सुरू असल्या, तरी विद्यार्थ्यांचा विरोध पाहता मुख्यमंत्री कार्यालय यावर काय निर्णय घेणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. उपजिल्हाधिकारी पदाचा कोटा शिल्लक नसतानाही ही प्रक्रिया राबविली जात असल्याची चर्चा सध्या म हसूल वर्तुळात रंगली आहे.



## संपादकीय....

### शर्तभंग

अमेरिका आणि इराण यांच्यातील युद्ध शस्त्रसंधी झाल्यानं आखाती देशातील संघर्ष थांबल्याचं चित्र निर्माण झालं होतं.मात्र, इस्त्रायलकडून शस्त्रसंधीचं उल्लंघन करण्यात आल्यानं इराणकडून मोठा निर्णय घेण्यात आला आहे. इराणनं होर्मुझची सामुद्रधुनी बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळं जगभरातील ऊर्जासाधनांच्या पुरवठ्यावर परिणाम होऊन पुन्हा तणाव वाढण्याची शक्यता आहे. इस्त्रायलकडून लेबनॉनमध्ये शस्त्रसंधीचं उल्लंघन केलं आहे. यामुळं इराणच्या नौदलानं होर्मुझची सामुद्रधुनी बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. होर्मुझची सामुद्रधुनी परवानगीशिवाय पार करु नये अशी धमकी देण्यात आल्याचं सांगण्यात येत आहे. इराणकडून या सर्व घटनाक्रमनंतर जहाजमालकांना इशारा देण्यात आलाय, परवानगीशिवाय जहाज होर्मुझमधून पार करण्याचा प्रयत्न करु नये. परवानगीशिवाय होर्मुझची सामुद्रधुनी पार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या जहाजांवर हल्ले करुन ती जहाजं नष्ट केली जातील. अमेरिका आणि इराण यांच्यात शस्त्रसंधी झाल्यानंतर परिस्थिती तणावपूर्ण आहे. सागरी नियंत्रण संस्थेनं मरीन ट्रॅफिकच्या हवाल्यानं इराण आणि अमेरिका यांच्यातील सशर्त शस्त्रसंधी झाल्यानंतर केवळ दोन जहा होर्मुझची सामुद्रधुनी पार करु शकली आहेत. यामुळ होर्मुझच्या सामुद्रधुनी पार करण्यासाठी थांबलेल्या जहाजांची चिंता वाढली आहे. अमेरिकेनं पूर्ण ताकद लावून देखील ४० दिवसांनंतर होर्मुझच्या सामुद्रधुनी खुली करण्यासाठी इराणला झुकवू शकला नाही. मात्र, अमेरिकेला शस्त्रसंधी करावी लागली. डोनाल्ड ट्रम्प यांनी वारंवार होर्मुझची सामुद्रधुनी खुली करणं प्राथमिकता असल्याचं म्हटलं. डोनाल्ड ट्रम्प यांनी होर्मुझच्या सामुद्रधुनी केवळ २ मिनिटांमध्ये खुली करु असे दावे केले होते. शस्त्रसंधी जाहीर झाल्यानंतर परिस्थिती वेगळी पाहायला मिळत आहे. इराणनं त्यांच्या अटीवर होर्मुझची सामुद्रधुनी उघडली होती. आता पुन्हा सामुद्रधुनी बंद करण्यात आली आहे. इराणनं होर्मुझमधून पार होणाऱ्या जहाजांवर टोल आकारणार असल्याचं म्हटलं होतं. इराणचं सैन्य पूर्ण मार्गावर नियंत्रण ठेवेल. जगातील ऊर्जा साधनांची २० टक्के वाहतूक होर्मुझच्या सामुद्रधुनीतून होते. इराणनं होर्मुझची सामुद्रधुनी सुरक्षित करण्यासाठी चार स्तरीय यंत्रणा तयार केलं आहे. यामध्ये क्षेपणास्त्र, युद्धनौका आणि ड्रोनचा समावेश आहे. दरम्यान, अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला जे देश शस्त्र पुरवठा करतील त्या देशांवर ५० टक्के निर्यात शुल्क लादण्याची धमकी दिली आहे.

# ‘माझे गाव, आरोग्यसंपन्न गाव’ राज्यव्यापी अभियानाचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते शुभारंभ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : जागतिक आरोग्य दिनानिमित्त महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाचा चेहरामोहरा बदलण्यासाठी आणि ग्रामीण जनतेला दर्जेदार आरोग्य सुविधा त्यांच्या उंबरठ्यावर उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने राज्य शासनाच्या 'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' या महत्त्वाकांक्षी अभियानाचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज शुभारंभ करण्यात आला.

यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांच्यासह अन्य मंत्रिमंडळ सदस्य उपस्थित होते.




सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी अभियानाविषयी मंत्रिमंडळाला माहिती दिली. अभियानाविषयी माहिती देण्यात येणाऱ्या व्हिडिओ आणि पुस्तिकेचे प्रकाशनही मान्यवरांच्या हस्ते यावेळी करण्यात आले.

राज्य शासनाने 'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' या अभियानाच्या माध्यमातून ग्रामीण महाराष्ट्रातील आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम, रोगमुक्त आणि स्वयंपूर्ण करण्याचा संकल्प केला आहे. लोकसहभागातून ही मोहीम व्यापक आरोग्य चळवळ म्हणून उभी राहावी, हा शासनाचा मानस असून, गावपातळीपासून राज्यस्तरापर्यंत आरोग्य सेवांचे सक्षमीकरण करण्यावर भर देण्यात येणार आहे.

या अभियानाचे वैशिष्ट्य म्हणजे उपचारांपेक्षा प्रतिबंधात्मक उपाययोजनांवर अधिक भर देणे. स्वच्छता, शुद्ध पाणी पुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन, पोषण, तसेच संसर्गजन्य व असंसर्गजन्य आजारांवर नियंत्रण यासारख्या मूलभूत घटकांवर लक्ष केंद्रित करून ग्रामीण नागरिकांच्या आरोग्यदायी जीवनशैलीला प्रोत्साहन दिले जाणार आहे. माता-बाल आरोग्य, मानसिक आरोग्य आणि बदलत्या जीवनशैलीशी निगडित आजारांनाही या मोहिमेत विशेष स्थान देण्यात आले आहे.

या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य, विभाग, जिल्हा आणि ग्रामपंचायत स्तरावर समित्यांची स्थापना करण्यात आली असून, ठरावीक निकषांनुसार उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या गावांना 'आरोग्यसंपन्न गाव' म्हणून गौरविण्यात येणार आहे. यासाठी राज्य शासनाने मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून दिला असून, ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, पंचायत समिती तसेच आरोग्य संस्थांना ६५.२५ कोटी रुपयांचे पुरस्कार देण्यात येणार आहेत.

'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' हे अभियान केवळ योजना नसून एक लोकचळवळ आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून ग्रामीण महाराष्ट्रातील आरोग्याचा स्तर उंचावून निरोगी, सशक्त आणि समृद्ध समाज घडविण्याचा मार्ग मोकळा होणार असल्याचा विश्वास यावेळी आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर आणि आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी व्यक्त केला.

# मध्य पूर्वेतील युद्धाचे अर्थव्यवस्थेवरील होणाऱ्या परिणामाचे अध्ययन करा : राज्यपाल जिष्णु देव वर्मा

मुंबई : मध्य पूर्वेतील युद्धामुळे जगातील प्रत्येक व्यक्तीचे जीवन बाधित झाले आहे. अनेक देशांच्या अर्थव्यवस्थेवर युद्धामुळे विपरीत परिणाम होत आहे. शताब्दी वर्षात पदार्पण करीत असलेल्या फिक्की संस्थेने या युद्धामुळे भारतीय अर्थव्यवस्थेवर विशेषत: सेवा तसेच सूक्ष्म, लघु व माध्यम उद्योगांवर होणाऱ्या संभाव्य परिणामांचे मूल्यांकन करावे व नुकसान कमी करण्याच्या दृष्टीने शिफारसी कराव्या असे आवाहन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी केले.

फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री (फिक्की) या संस्थेचा ९९ वा स्थापना दिवस राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी पणन मंत्री जयकुमार रावल उपस्थित होते.




युद्धामुळे माहिती तंत्रज्ञान क्षेत्रावर देखील विपरीत परिणाम होत आहे. काही कंपन्यांनी मोठी कर्मचारी कपात केली आहे. युद्धाची झळ जनसामान्यांना बसू नये याकरिता शासन आपल्या स्तरावर सर्वतोपरी प्रयत्न करीत आहे. 'फिक्की'ने देखील लोकांच्या कौशल्य वर्धनासंबंधी शिफारशी कराव्या असे राज्यपालांनी सांगितले. फिक्कीने राज्यातील विद्यापीठांसोबत काम करावे तसेच स्नातकांसाठी प्रशिक्षणाच्या संधी निर्माण कराव्या असे आवाहन देखील राज्यपालांनी यावेळी केले.

भारत ही सर्वात जलद गतीने वाढत असलेली अर्थव्यवस्था असून राज्याचे देशाच्या अर्थव्यवस्थेमध्ये योगदान सर्वाधिक असून राज्य थेट परकीय गुंतवणुकीच्या बाबतीत सर्वात आघाडीवर आहे. राजशिष्टाचार विभागाने थेट परकीय गुंतवणूक वाढवण्यासाठी व देश विदेशातील महाराष्ट्राच्या लोकांना राज्याच्या अर्थव्यवस्थेशी जोडण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले.

महात्मा गांधी यांच्या सूचनेवरून फिक्की संस्थेची सुरुवात मुंबई येथे झाली. पुढील वर्षी फिक्की शताब्दी वर्ष साजरे करीत आहे, असे फिक्कीचे अध्यक्ष अनंत गोयंका यांनी यावेळी सांगितले. .

यावेळी राज्यपालांच्या हस्ते फिक्कीचे गेल्या तीस वर्षामधील माजी अध्यक्ष राजीव भारती मित्तल, हर्ष पती सिंघानिया, राजीव चंद्रशेखर, हाबिलं खोराकीवाला, हर्ष मरीवाला, सरोज कुमार पोद्दार, ओंकार कंवल, डॉ. ए. सी. मुथैय्या, राजेंद्र लोढा, चिरायू अमीन, सुधीर जालान, के के मोदी, ए एस कासलीवाल, दीपक बँकर, ए. के. रुंगटा आदींचा त्यांच्या उद्योग जगातला दिलेल्या योगदानाबद्दल सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाला फिक्कीचे वरिष्ठ उपाध्यक्ष विजय शंकर, संस्थेच्या महासंचालक ज्योती वीज, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, राज्यपालांचे सहसचिव एस. राममूर्ती आदी उपस्थित होते.

# अवकाळीने झालेल्या नुकसानीपोटी शेतकऱ्यांना १२८ कोटी ६५ लाखांची मदत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : राज्यात ऑक्टोंबर ते डिसेंबर २०२५ दरम्यान झालेल्या अवकाळी पावसाच्या नुकसानीपोटी १ लाख ८० हजार ५७४ शेतकऱ्यांना १२८ कोटी ६५ लाख रुपयांची मदत देण्यात आल्याची माहिती मंत्रिमंडळ बैठकीत देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

ऑक्टोबर ते डिसेंबर २०२५ दरम्यान झालेल्या अवकाळी पावसाने राज्यात शेतीचे सुमारे १ लाख १४ हजार ७५२ हेक्टर क्षेत्र बाधित झाले. यामुळे १ लाख ८० हजार ५७४ शेतकऱ्यांच्या शेती आणि शेतीमालाचे नुकसान झाले. या नुकसान भरपाईपोटी शेतकऱ्यांना १२८.८६ कोटी रुपयांची मदत करण्यात आली आहे. हे नुकसान प्रामुख्याने चंद्रपूर, धुळे, गडचिरोली, जळगाव, नाशिक, रायगड, सिंधुदुर्ग या जिल्ह्यात झाले होते.

जानेवारी ते मार्च २०२६ दरम्यान झालेल्या अवकाळी पावसामुळे एकूण १,४५,६०६ हेक्टरखालील शेतीचे नुकसान झाले असून २,३३,८९० शेतकऱ्यांना फटका बसला आहे. या पावसामुळे केळी, कांदा, पपई, आंबा, द्राक्षे, गहू, हरभरा, ज्वारी इत्यादी पिकांचे नुकसान झाले आहे. प्रामुख्याने लातूर, सोलापूर, नाशिक, सातारा, धुळे, नंदूरबार, यवतमाळ, अहिल्यानगर, पुणे, जालना, छत्रपती संभाजीनगर, बुलढाणा, आणि बीड जिल्ह्यांचा समावेश आहे. या अवकाळी पावसामुळे पाच लोकांचा मृत्यु आणि नऊ लोक जखमी झाले. अवकाळी पावसामुळे ३६ जनावरांचाही मृत्यु झाला आहे.

एप्रिल २०२६ मध्ये झालेल्या पावसानेही १,९४,३२९ शेतकऱ्यांच्या १,२२,९९३ हेक्टर क्षेत्राचे नुकसान झाल्याचे प्राथमिक अंदाजानुसार स्पष्ट झाले आहे. जानेवारीपासून झालेल्या अवकाळी पावसाने नुकसानीच्या पंचनाम्याची कार्यवाही सुरू आहे.

दरम्यान जुलै २०२२ पासून जलसंपदा विभागाचे ४१ प्रकल्प पूर्ण झाले असून सुमारे १०५ टीएमसी पाणीसाठा तयार झाला असल्याची माहिती देण्यात आली. या प्रकल्पांमुळे अतिरिक्त २.९५ लाख हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली आहे.

जुलै २०२२ पासून आजपर्यंत २२५ प्रकल्पांना सुधारित तसेच प्रशासकीय मान्यता देण्यात आली. या मान्यता ४.३५ लाख कोटी रुपयांच्या असून हे सर्व प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर ३३.४५ लाख हेक्टर सिंचन क्षमता तयार होईल, अशी माहिती जलसंपदा विभागाने सादरीकरणाद्वारे दिली.

# वागदरी येथे अन्न सुरक्षा योजने अंतर्गत रेशन कार्डचे वाटप संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



अक्कलकोट/प्रतिनिधी : एका गरीब कुटुंबासाठी रेशन कार्ड म्हणजे केवळ कागदाचा तुकडा नसतो, तर तो त्यांच्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहाचा मोठा आधार असतो. आज वागदरी येथील अशाच ५० गरजू कुटुंबांच्या चेहऱ्यावर एक वेगळेच समाधान पाहायला मिळाले.

आमदार श्री. सचिनदादा कल्याणशेट्टी यांच्या आस्थेपोटी आणि मार्गदर्शनाखाली अन्नसुरक्षा योजनेअंतर्गत (छत्रड) मंजूर झालेल्या ५० पात्र कुटुंबांना आज शिधापत्रिकांचे (रेशन कार्ड) वाटप करण्यात आले. हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी ग्राम पंचायत सदस्या शारदाताई रोट्टे यांनी विशेष पाठपुरावा आणि प्रयत्न केले, ज्याचा लाभ आज गावातील गरजू कुटुंबांना मिळत आहे.

अनेक दिवसांपासून या कुटुंबांची प्रतीक्षा सुरू होती, पण आज त्यांच्या हातातील रेशन कार्ड पाहून त्यांच्या डोळ्यांत आलेले कृतज्ञतेचे भाव सर्वकाही सांगून गेले. आता या कुटुंबांना शासनाच्या स्वस्त धान्य योजनेचा थेट लाभ मिळेल, ज्यामुळे त्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न सुसह्य होईल.

याप्रसंगी श्री रविकिरण वरनाळे ,श्री शाणप्पा मंगाणे, श्री परमेश्वर शेळके सावकार, श्री सुनील सावंत,श्री संतोष पोमाजी ,ग्रामपंचायत सदस्य शारदाताई रोट्टे, जयश्री बटगेरी, श्री महादेव सोनकवडे, श्री बसवराज नडगेरी,श्री मुत्तण्णा दुधगी, सौ कावेरी नंजूडे आणि लाभार्थी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**डॉ. सविता बेदरकर यांचे प्रतिपादन**

**सामाजिक समता सप्ताह व चवदार तळे सत्याग्रह शताब्दी वर्ष साजरे**

# विद्यार्थ्यांना फुले शाहू आंबेडकर यांच्या विचारांचा कोर्स करावा लागेल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुन्नाभाई नंदागवळी/गोंदिया : माणसाला जगण्यासाठी अन्नाची गरज आहे. तसेच महापुरुषांच्या विचारांची नितांत आवश्यकता आहे. ह्याशिवाय माणूस म्हणून पूर्ण होणार नाही. यासाठी जीवंत प्राणी मात्रांना व विद्यार्थ्यांना फुले शाहू आंबेडकर यांच्या विचारांचा कोर्स करावा लागणार आहे. हे वास्तव सत्य नाकारता येऊ शकणार नाही. असे प्रतिपादन आंबेडकरवादी विचारवंत व सामाजिक कार्यकर्त्या डॉ. सविता बेदरकर यांनी केले. त्या प्रमुख व्याखात्या (मार्गदर्शक) म्हणून बोलत होत्या.

यावेळी मंचावर शाळेचे मुख्याध्यापक रविशंकर इठूले यांच्या अध्यक्षतेखाली नीता भलमे, पुष्कराज लांजेवार, साधना पारधी, कार्तिक शहारे, दीक्षा तुरकर, तुषार महाजन आदी कर्मचारी प्रामुख्याने उपस्थित होते. प्रसंगी सावित्रीबाई फुले व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पमाला अर्पण करून अभिवादन करण्यात आले.






सदर कार्यक्रम हा सामाजिक समता सप्ताह व महाळ चवदार तळे सत्याग्रह शताब्दी वर्ष निमित्ताने अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा नंगपूरामुर्री येथे सकाळी ११.३० वाजता आयोजित करण्यात आले होते.

मार्गदर्शन करतांना डॉ. बेदरकर यांनी महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर व अन्य महापुरुषांच्या विचारांवर व कार्यावर प्रगाढ प्रकाश टाकून विद्यार्थ्यांना सखोल माहिती दिली. संचालन प्रदीप ढवळे यांनी केले तर आभार आशिष शहारे यांनी मानले. यशस्वीतेसाठी कर्मचारी व विद्यार्थी यांनी सहकार्य केले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# निफाड मतदार संघात सन २०२५-२६ या वर्षात ५.२८ कोटी आमदार निधी मंजूर : आ. दिलीप बनकर

## विविध विकासकामे लागणार मार्गी; जिल्हाधिकारी व संबंधित अधिकाऱ्यांचे आ. बनकर यांनी मानले आभार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड विधानसभा मतदार संघात सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात विविध विकास कामांसाठी रक्कम रु.५.२८ कोटी निधी मंजूर झाला असल्याची माहिती आमदार दिलीपराव बनकर यांनी दिली.



एकूण २९ गावांमध्ये सभामंडप, सौर पथदीप, रस्ते, भक्तनिवास, संरक्षण भिंत, सभागृह आदी कामांचा समावेश आहे. यात करंजगांव येथील श्री सटुबाई मंदिर परिसरात ग्रामपंचायतीच्या मोकळ्या जागेवर सभामंडप बांधणे. (रक्कम रु.१० लक्ष), करंजगांव येथे आदिवासी वस्तीत सौर पथदिप बसविणे. (रक्कम रु.७.५० लक्ष), नैताळे येथील श्री लक्ष्मीबाई माता मंदिर परिसरात (वार्ड क्र.४) ग्रामपंचायतीच्या मोकळ्या जागेवर सभामंडप बांधणे. (रक्कम रु.१० लक्ष), श्रीरामनगर (कोळवाडी) येथे श्री महादेव मंदिर परिसरात ग्रामपंचायतीच्या मोकळ्या जागेवर सभामंडप बांधणे. (रक्कम रु.१० लक्ष), आहेरगाव येथील श्री दातावली महाराज मंदिर परिसरात ग्रामपंचायतीच्या मोकळ्या जागेवर सभामंडप बांधणे. (रक्कम रु.१० लक्ष), चांदोरी येथे मेंढवाडा परिसरात ग्रामपंचायतीच्या मोकळ्या जागेवर सभामंडप बांधणे. (रक्कम रु.१० लक्ष), चापडगाव येथील श्री हनुमान मंदिर व श्री खंडेराव मंदिर परिसरात ग्रामपंचायतीच्या मोकळ्या जागेवर भक्त निवास बांधणे. (रक्कम रु.१५ लक्ष), पालखेड प्राथमिक आरोग्य उपकेंद्राला संरक्षण भिंत बांधणे. (रक्कम रु.१० लक्ष), पिंपळस कारखाना येथे श्री नर्मदेश्वर महादेव मंदिर परिसरात ग्रामपंचायतीच्या मोकळ्या जागेवर सभामंडप बांधणे. (रक्कम रु.१५ लक्ष), शिंगवे ग्रामपंचायतीच्या मोकळ्या जागेवर सभामंडप बांधणे. (रक्कम रु.१० लक्ष), सायखेडा येथील (शिंपी समाज) ग्रामपंचायतीच्या मोकळ्या जागेवर सभामंडप बांधणे. (रक्कम रु.१० लक्ष), करंजगाव येथील आदिवासी वस्तीतील श्री सप्तशृंगी माता देवस्थान परिसरात सभामंडप बांधणे. (रक्कम रु.१५ लक्ष), कोठुरे येथील आदिवासी वस्तीत सभामंडप बांधणे. (रक्कम रु.१५ लक्ष), कसबे सुकेणे येथील सप्तशृंगी नगर (बारा बंगले) येथे सभामंडप बांधणे. (रक्कम रु.१० लक्ष), वावी ठुशी येथे जेष्ठ नागरीकांसाठी सामाजिक सभागृह बांधणे. (रक्कम रु.१० लक्ष), श्रीराम नगर येथील श्री मारुती देवस्थान परिसरात सभामंडप बांधणे. (रक्कम रु.१० लक्ष), औरंगपुर येथील श्री खंडेराव महाराज मंदिर परिसरामध्ये सभागृह बांधणे. (रक्कम रु.२५ लक्ष), जळगाव येथील श्री खंडेराव मंदिर परिसरात आदिवासी वस्तीत सभामंडप बांधणे. (रक्कम रु.१० लक्ष), रानवड येथील श्री मारुती मंदिर परिसरात सभामंडप बांधणे. (रक्कम रु.२० लक्ष), रौळस येथील आदिवासी वस्तीत सभामंडप बांधणे. (रक्कम रु.१० लक्ष), कारसुळ येथील जुना रौळस रस्त्याची सुधारणा करणे. भाग -१ (रक्कम रु.२५ लक्ष), कारसुळ येथील जुना रौळस रस्त्याची सुधारणा करणे. भाग -२ (रक्कम रु.२५ लक्ष), सावरगाव येथील श्री खंडेराव महाराज देवस्थान परिसरात सभामंडप बांधणे. (रक्कम रु.१० लक्ष), खानगाव थडी येथील श्री विठ्ठल रुख्मिणी देवस्थान परिसरात सभामंडप बांधणे. (रक्कम रु.१० लक्ष), उंबरखेड येथे मारुती मंदिर देवस्थान परिसरात सभामंडप बांधणे. (रक्कम रु.१५ लक्ष), कसबे सुकेणे येथील रावसाहेब नगर अंतर्गत रस्ते मजबुतीकरण करणे.

(रक्कम रु.२५ लक्ष), कुंदेवाडी येथील घेगडे नगरमधील ग्रामपंचायतीच्या मोकळ्या जागेत सभामंडप बांधणे. (रक्कम रु.१५ लक्ष), जळगाव येथील गाव अंतर्गत रस्ता काँक्रीटीकरण करणे. (रक्कम रु.१५ लक्ष), दारणासांगवी येथील श्री खंडेराव महाराज देवस्थान परिसरात सभामंडप बांधणे. (रक्कम रु.१५ लक्ष), शिंपीटाकळी येथील ग्रामा २२४ ते लोखंडे वस्ती रस्त्याची सुधारणा करणे. (रक्कम रु.१० लक्ष), शिवरे गाव अंतर्गत रस्ता काँक्रीटीकरण करणे. (रक्कम रु.२५ लक्ष), भेंडाळी येथील गोसावी बाबा देवस्थान परिसरात सभामंडप बांधणे. (रक्कम रु.१० लक्ष), लोणवाडी येथील लोणवाडी - शिरवाडे वणी रस्त्याची सुधारणा करणे. (रक्कम रु.२५ लक्ष), पिंपळगाव बसवंत येथील त्रिमूर्ती कॉलनी मधील नगरपरिषदेच्या मोकळ्या जागेत सभामंडप बांधणे. (रक्कम रु.२० लक्ष), पिंपळगाव बसवंत येथील रा मा क्र.३ ते महाले वस्ती (घागरनाला) रस्त्याची सुधारणा करणे. (रक्कम रु.१५ लक्ष), पिंपळगाव बसवंत येथील शांतीनगर मधील श्री दुर्गा माता मंदिर परिसरात सभामंडप बांधणे. (रक्कम रु.१५ लक्ष), ओझर मिग येथील दिक्षी सुकेणे रोडलगत असलेल्या गंगापूर कॅनॉल/ डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगर, एरंडवाडी, रामजीनगर रोडवर स्ट्रीट लाईट बसविणे. (रक्कम रु.१० लक्ष) या कामांचा समावेश आहे. सदर कामे मंजुरी करिता सहकार्य केल्याबद्दल मा.जिल्हाधिकारी व सबंधित अधिकारी यांचे निफाड तालुक्यातील जनतेच्या वतीने आमदार दिलीप बनकर यांनी आभार मानले.

## नांदूर मध्यमेश्वर व देवगाव येथे छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिराचे आयोजन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : शासन आपल्या दारी या संकल्पनेतून नागरिकांच्या तक्रारींचे तातडीने निवारण करण्यासाठी निफाड तालुक्यात छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. नागरिकांना विविध शासकीय योजनांचा लाभ एकाच छताखाली मिळावा, तसेच महसूल व इतर विभागांशी संबंधित प्रलंबित कामे तत्काळ निकाली काढण्याच्या उद्देशाने हे शिबिर आयोजित करण्यात येत आहे.

हे शिबिर शुक्रवार, दिनांक १० एप्रिल २०२६ रोजी नांदूर मध्यमेश्वर तसेच देवगाव येथे आयोजित करण्यात आले आहे. या शिबिरामध्ये महसूल विभागाशी संबंधित ७/१२ उतारे, फेरफार नोंदी, विविध दाखल्यांचे वाटप, तसेच उत्पन्न, रहिवासी, जातीचे दाखले व नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्रांसाठी अर्ज स्वीकारले जाणार आहेत. याशिवाय संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ योजना, रेशन कार्डाशी संबंधित कामे, आरोग्य तपासणी, आयुष्मान भारत कार्डाबाबत मार्गदर्शन तसेच कृषी विभागाच्या विविध योजनांची माहिती शेतकऱ्यांना दिली जाणार आहे.

शिबिरास उपस्थित राहणाऱ्या नागरिकांनी आधार कार्ड, रेशन कार्ड, बँक पासबुक तसेच आवश्यक कागदपत्रे सोबत आणावीत. अनेक सेवांसाठी प्रत्यक्ष अर्ज स्वीकारले जाणार असल्याने संबंधित तलाठी किंवा ग्रामसेवकांशी पूर्व संपर्क साधल्यास प्रक्रिया अधिक सुलभ होईल. शिबिर सकाळी १० वाजेपासून सुरू होणार असल्याने नागरिकांनी वेळेवर उपस्थित राहावे, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

या प्रसंगी प्रांताधिकारी डॉ. शशिकांत मंगरुळे, तहसीलदार विशाल नाईकवाडे, नायब तहसीलदार राहुल मुळीक, बाबासाहेब खेडकर तसेच विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित राहणार आहेत.

नांदूर मध्यमेश्वर व देवगाव परिसरातील जास्तीत जास्त नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेऊन आपल्या प्रलंबित कामांचा निपटारा करून घ्यावा, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

## तहसील कार्यालय निफाडकडून प्रमाणपत्रे 'हायटेक'; फोटो व क्यूआर कोडसह नवे स्वरूप लागू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : नागरिकांना अधिक सुरक्षित, पारदर्शक आणि विश्वासार्ह सेवा देण्याच्या उद्देशाने तहसील कार्यालय निफाडकडून देण्यात येणाऱ्या विविध प्रमाणपत्रांमध्ये महत्त्वपूर्ण बदल करण्यात आला आहे. यानुसार तहसील कार्यालयामार्फत मिळणारी सर्व प्रमाणपत्रे आता आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने 'हायटेक' स्वरूपात उपलब्ध होणार आहेत.

तहसील कार्यालयाकडून मिळणाऱ्या प्रमाणपत्रांवर आता अर्जदाराचा फोटो तसेच टठ कोड अनिवार्य करण्यात येणार आहे. जात, उत्पन्न, रहिवासी, नॉन-क्रीमी लेयर यांसह विविध प्रकारच्या प्रमाणपत्रांसाठी हा बदल लागू राहणार आहे. या निर्णयामुळे प्रमाणपत्रांची सत्यता अधिक प्रभावीपणे तपासता येणार असून बनावट प्रमाणपत्रांच्या प्रकारांना आळा बसण्यास मदत होणार आहे.

> **प्रमाणपत्रांवर टठ कोड व अर्जदाराचा फोटो समाविष्ट केल्यामुळे बनावट प्रमाणपत्रांवर नियंत्रण मिळवता येईल. तसेच टठ कोड स्कॅन करून प्रमाणपत्राची तत्काळ पडताळणी करू शकतील. अर्जदार यांचा मोबाईल नंबर जोडल्यामुळे अर्जाची सद्यस्थिती अर्जदार यांना मोबाईलवर समजण्यास मदत होईल यामुळे नागरिकांचा वेळ वाचेल आणि सेवा अधिक सुलभ होईल.**
>
> **– विशाल नाईकवाडे**
> **तहसीलदार निफाड**

नव्या प्रणालीअंतर्गत प्रत्येक प्रमाणपत्रावर छापण्यात आलेला टठ कोड स्कॅन केल्यास संबंधित प्रमाणपत्राची तत्काळ ऑनलाइन पडताळणी करता येणार आहे. त्यामुळे शासकीय कार्यालये, शैक्षणिक संस्था तसेच इतर ठिकाणी प्रमाणपत्रांच्या पडताळणीची प्रक्रिया अधिक सुलभ व जलद होणार आहे. तसेच अर्जदाराचा फोटो समाविष्ट केल्यामुळे प्रमाणपत्रांचा गैरवापर टाळण्यास मदत होणार आहे.



तहसील कार्यालय निफाडमार्फत सर्व नागरिकांनी या नव्या सुविधेचा लाभ घ्यावा तसेच प्रमाणपत्रांसाठी अर्ज करताना आवश्यक माहिती अचूक द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

## पंढरपूर शहर समस्त नाभिक समाज आयोजित हिंदवी स्वराज्य भूषण शिवबा काशीद जन्मोत्सव सोहळा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : नूतन पदाधिकाऱ्यांची पुढील प्रमाणे निवडी करण्यात आल्या.

अध्यक्ष-श्री तुकाराम धोंडीबा चव्हाण, उपाध्यक्ष-श्री राकेश नागनाथ देवकर, खजिनदार-श्री अविनाश रमेश शेटे, कार्याध्यक्ष-श्री साईनाथ अशोक शिंदे, सचिव-अनिल केशव शेटे, यांच्या निवडी करण्यात आल्या.

ठराव पुढीलप्रमाणे,



१) जन्मोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात यावा व यावर्षी मिरवणुकी ही चांगल्या उत्साहात काढण्यात यावी.

२) छत्रपती शिवाजी महाराज चौक, व शिवबा काशीद चौकात दोन्हीकडे हिंदवी स्वराज्य भूषण शोभा काशीद मध्यवर्ती सोहळा समिती जन्मोत्सव साजरा करणार,

३) जन्मोत्सव साजरा करताना कोणत्या पदाचे व कोणत्या संघटनेचा वापर करायचा नाही.

४) निमानपत्रिकेमध्ये समाज बांधवांचे फक्त आडनावच टाकायचे,

५) कोणत्याही समाज बांधवांनी शुभेच्छांचा बोर्ड किंवा होल्डिंग सौजन्य म्हणून हिंदवी स्वराज्य भूषण शोभा काशीद जन्मोत्सव सोहळा समिती व समस्त नाभिक समाज पंढरपूर असा उल्लेख करावा.

६) सर्व समाज बांधवांनी एकजुटीने जन्मोत्सव सोहळा पार पाडायचा आहे कुठला गट तट करायची नाही.

असे ठराव करण्यात आले.

अध्यक्ष भाई किशोर भोसले, ज्येष्ठ बबन काका शेटे, बाळासाहेब देवकर जितेंद्र भोसले, महेश माने, युवराज हडपद कधी जण उपस्थित होते.

## १५ एप्रिल पासून एसटीच्या तिकिटा दरात दहा टक्के वाढ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने उन्हाळी हंगामा निमित्त एसटीच्या तिकीट दरात दहा टक्के वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे ही दरवाढ १५ एप्रिल पासून लागू होणार आहे त्यामुळे प्रवाशांना आर्थिक फटका बसणार आहे.



गाव तिथे एसटी एसटीच्या सुरक्षित प्रवास तसेच एसटीने आणि सवलती जाहीर केल्यामुळे एसटीच्या प्रवासी संस्थेमध्ये वाढ झाली आहे प्रत्येक वर्षी उन्हाळ्यामध्ये एसटीचे प्रवासी मोठ्या संख्येने वाढतात त्यामुळे या हंगामात एसटी कडून हंगामी दरवाढ केले आहे सदरच्या वर्षी १५ एप्रिल पासून दहा टक्के दरवाढ करण्यात आले आहे त्यामुळे प्रवाशांना आर्थिक फटका बसणार असून लांब पल्ल्याच्या प्रवाशांना ५० ते १०० रुपयाचा बोधन बसणार आहे.

### खासदार प्रणिती शिंदे यांची पाहणी, तातडीच्या मदतीची मागणी

## गारपीट आणि अवकाळी पावसाचा तडाखा: मोहोळ तालुक्यातील पिकाची मोठे नुकसान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : मोहोळ तालुक्यातील काही दिवसांपूर्वी झालेल्या वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस आणि गारपिटीमुळे शेतीचे मोठे नुकसान झाले आहे. या अचानक बदललेल्या हवामानामुळे काढणीस आलेली पिके व फळबागा मोठ्या प्रमाणात जमीनदोस्त झाल्या असून शेतकऱ्यांच्या हातात तोंडाशी आलेला घास हिसकावला गेल्याची भावना व्यक्त होत आहे. तालुक्यातील द्राक्ष, कांदा, केळी, पेरू, डाळिंब यासह विविध फळबागा भाजीपाला आणि काढणीच्या उंबरठ्यावर आलेली पिके पूर्णतः नुकसानग्रस्त झाले आहे.



आज सोलापूर लोकसभा मतदारसंघाच्या खासदार प्रणिती शिंदे यांनी मोहोळ तालुक्यातील पापरी, येवती, खंडाळी आधी गावांना भेट देत प्रत्यक्ष शेतात जाऊन नुकसानीची पाहणी केली. यावेळी त्यांनी प्रशासनाने तात्काळ पंचनामे करून आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांचा नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी केली. तसेच शासनाने तातडीच्या उपायोजना करून ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना दिलासा देणे आवश्यक असल्याची त्यांनी सांगितले.

या पाहणी दौऱ्या वेळी मोहोळ तालुका काँग्रेसचे अध्यक्ष सुलेमान तांबोळी जिल्हा काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष राजेश पवार, समन्वयक मनोज एल्गुलवार कुमार गोडसे, बाबुराव भोसले, दत्तात्रय कदम, भारत मुळे सुनील वाघमारे, उत्तम मुळे यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त विवेक विचार मंचतर्फे शैक्षणिक साहित्याचे वाटप




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : सोलापूरच्या सम्राट चौक येथील कर्मवीर भाऊराव पाटील रयत शिक्षण अंतर्गत रावजी सखाराम हायस्कूलमध्ये विवेक विचार मंचतर्फे आयोजित शालेय शिक्षण साहित्य वाटप नगरसेवक बिज्जू प्रधाने यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी जिल्हा संयोजिका अश्विनीताई चव्हाण, सोलापूर श्रमिक पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष दशरथजी वडतीले ,अनिकेत प्रधाने , राजू सखाराम हायस्कूलचे प्राचार्य भारत केत आणि शहर संयोजक सिद्धांत बाबा बाबरे उपस्थित होते.

प्रथम कर्मवीर भाऊराव पाटील आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले, त्यानंतर विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप नगरसेवक बिज्जू प्रधाने व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.या कार्यक्रमात हायस्कूल आणि प्राथमिक शिक्षकांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गजानन गोरे यांनी केले,तर आभार रमेश वडावराव यांनी मानले.तसेच या कार्यक्रमात काही गुणवंत विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र व प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

# उद्योगपती अनंत मुकेश अंबानी यांच्या वाढदिवसानिमित्त आज सोलापुरात समाजसेवेचा महाउपक्रम

## ५ हजार घरांत देणार अनंत आनंदाचा शिधा; १४ ठिकाणी होणार अन्न, शिक्षण, आरोग्य, पाणी आणि स्वावलंबन उपक्रमाचा संगम; एक वाढदिवस हजारो हास्य...माणुसकीचा महोत्सव

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : प्रसिद्ध उद्योगपती अनंत मुकेश अंबानी यांच्या वाढदिवसानिमित्त शिखर पहारिया फाउंडेशनच्या वतीने गुरुवार दि. ९ एप्रिल २०२६ रोजी शहर व जिल्ह्यात तब्बल १४ ठिकाणी विविध समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमांतर्गत सोलापूर शहरातील जुनी मिल कंपाऊंड मैदान येथे ५ हजार गरजू कुटुंबांना अन्नधान्य किट वाटप करून कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात येणार आहे. याच वेळी इतर उपक्रमांचाही प्रारंभ होणार आहे. सोलापुरात समाजसेवेचा महाउपक्रम आणि माणुसकीचा महोत्सव होणार आहे, अशी माहिती फाउंडेशनचे तन्वीर शेख आणि राज सलगर यांनी दिली.



या कार्यक्रमास मान्यवर उपस्थित राहणार आहेत. फाउंडेशनच्या पदाधिकाऱ्यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. दिवसभरात सोलापूर शहर व जिल्ह्यात विविध १४ ठिकाणी हे उपक्रम राबविले जाणार आहेत. जिल्ह्यातील २०० विद्यार्थिनींना सायकली, १ हजार विद्यार्थ्यांना स्कूल बॅगचे वाटप करण्यात येणार आहे. अनाथ आश्रमासाठी ५० बेड देण्यात येणार असून, २०० महिलांना शिलाई मशीनचे वितरण करून त्यांना स्वावलंबनाकडे वाटचाल करण्यास मदत केली जाणार आहे.

शिक्षणाच्या गुणवत्तेसाठी विविध १० शाळांमध्ये आरओ फिल्टर प्लांट बसविण्यात येणार आहेत. तसेच शहर व जिल्ह्यातील शाळांना डिजिटल स्मार्ट बोर्ड देण्यात येणार असून, १० शाळांमध्ये संगणक संच देऊन विद्यार्थ्यांना संगणक साक्षर करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. आर्थिक अडचणीमुळे शिक्षणापासून वंचित राहू नयेत या उद्देशाने ३०० विद्यार्थ्यांना शैक्षणिकदृष्ट्या दत्तक घेण्यात येणार आहे. याशिवाय सोलापुरात १०० ठिकाणी जनावरांसाठी पाण्याची सोय करण्यासाठी पाण्याची पात्रे बसविण्यात येणार असून, त्याठिकाणी नियमित पाणी पुरवठाही केला जाणार आहे.

वादळी वाऱ्यामुळे नुकसान झालेल्या घरांसाठी तसेच मंदिरांसाठी १ हजार पत्र्यांचे वाटप करण्यात येणार आहे. कुंभारी येथील लोकशाहीर आण्णाभाऊ साठे नगर येथे बोअर मारून सबमर्सिबल पंप बसविण्यात येणार असून ग्रामस्थांच्या पाण्याची सोय केली जाणार आहे. तसेच कुंभारी येथील गेनसिद्ध देवालय येथे ५८.५ केव्हीए क्षमतेचा जनरेटर बसविण्यात येणार आहे.

आरोग्य उपक्रम राबवून मोठा दिलासा देण्यात येणार असून आर्थिकदृष्ट्या अडचणीत असलेल्या गरजू रुग्णांसाठी विविध प्रकारच्या १०० शस्त्रक्रिया मोफत करण्यात येणार आहेत. एकाच दिवशी इतक्या व्यापक प्रमाणावर राबविण्यात येणाऱ्या या महाउपक्रमामुळे सोलापूर जिल्ह्यात माणुसकीचा महोत्सव होणार आहे. या कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन फाउंडेशनचे धर्मराज गुंडे, कौशल शिंदे, सूर्या शेट्टीयार, तुषार जोगदनकर, धीरज कारंडे यांनी केले आहे

**वाढदिवसानिमित्त उपक्रमाची ठळक वैशिष्ट्ये**

- सोलापूर शहर-जिल्ह्यात १४ ठिकाणी एकाच दिवशी उपक्रम
- ५ हजार कुटुंबांना अन्नधान्य किट करत गरजूंना थेट आधार
- शिक्षण, आरोग्य, पाणी व स्वावलंबनावर विशेष भर
- वरिष्ठ प्रशासनिक अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत शुभारंभ
- ३०० विद्यार्थी दत्तक , १ हजार बॅग, २०० मुलींना सायकली वाटप
- १०० मोफत शस्त्रक्रियाने गरीब रुग्णांना दिलासा
- २०० महिलांना शिलाई मशीन

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे समतेचे कार्य प्रेरणादायी : डॉ. सुचिता शिंदे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी देशातील सर्व घटकांना भारतीय राज्यघटनेत स्वातंत्र्य , समता ,

### बार्टी संस्थेत सामाजिक समता सप्ताहचे उद्घाटन

बंधुभाव आणि न्याय मिळवून दिला.त्यांनी मिळवून दिलेल्या आधिकारामुळेच आज आपण प्रशासनात काम करत आहोत, त्यांचे समतेचे कार्य हे प्रेरणादायी आहे,

डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य हे शब्दात व पुस्तकात मोजता येत नसुन त्यांचे कार्य हे अखंड व आपल्या सर्वांसाठी प्रेरणादायी असल्याचे मत बार्टीच्या निबंधक डॉ सुचिता शिंदे यांनी बोलताना व्यक्त केले.



बार्टी आयोजित सामाजिक समता सप्ताह २०२६ या कार्यक्रमांचे उद्धघाटक म्हणून त्या बोलत होत्या.

डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे संस्थेच्या वतीने डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त दिनांक ८ एप्रिल ते १४ एप्रिल २०२६ पर्यंत विविध प्रबोधनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

राज्याचे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे मंत्री ना संजयजी शिरसाट, प्रधान सचिव डॉ हर्षदीप कांबळे, समाजकल्याणच्या आयुक्त तथा बार्टीच्या महासंचालक श्रीमती दिपा मुधोळ -मुंडे, निबंधक डॉ सुचिता शिंदे, विभागप्रमुख डॉ बबन जोगदंड यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण राज्यभरात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात येत आहे.

प्रबोधनात्मक कार्यक्रम, अभिवादन ,संविधान जनजागृती अभियान, समता रॅली, १२ तास अभ्यास, रक्तदान शिबिर आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते अभिवादन करण्यात आले. भारतीय राज्यघटनेच्या उद्देशिकेचे सामुदायिक पणे वाचण करण्यात आले.

याप्रसंगी विभागप्रमुख रविंद्र कदम, शुभांगी पाटील, डॉ बबन जोगदंड, लेखाधिकारी नितीन चव्हाण यांच्यासह बार्टी संस्थेतील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सुत्रसंचलन रामदास लोखंडे यांनी केले. आभार डॉ बबन जोगदंड यांनी मानले.

# पारा येथे भीमजयंती निमित्त भीमजन्मोत्सव समितीच्या वतीने विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पारा : प्रतिनिधी, प्रेम शिनगारे, वाशी तालुक्यातील पारा येथे भीमजयंती निमित्त भीमजन्मोत्सव समितीच्या वतीने विविध सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात येत असून, त्याचाच एक भाग म्हणून सामान्य ज्ञान स्पर्धेचे यशस्वी आयोजन करण्यात आले.

ही स्पर्धा जि. प. केंद्रीय प्राथमिक शाळा पारा, जय भवानी विद्यालय पारा, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा डोंगरेवाडी, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सारोळा, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पिंपळगाव तसेच कन्या प्रशाला वाशी या विविध शाळांमध्ये उत्साहात पार पडली. विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून



स्पर्धेला चांगला प्रतिसाद दिला.

भीमजयंती निमित्त केवळ उत्सवापुरते मर्यादित न राहता विद्यार्थ्यांमध्ये ज्ञानाची आवड निर्माण व्हावी, स्पर्धात्मक भावना वाढीस लागावी आणि सामाजिक जाणीव दृढ व्हावी या उद्देशाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमासाठी भीमनगर परिसरातील तरुणांनी एकत्र येत नियोजनपूर्वक मेहनत घेतली. त्यांच्या प्रयत्नांमुळे कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला. पुढील काळातही असेच सामाजिक व शैक्षणिक उपक्रम राबवण्याचा समितीचा मानस आहे.

विशेष म्हणजे या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाबाबत उत्सुकता वाढली असून शिक्षक व पालकांनीही या उपक्रमाचे स्वागत केले. ग्रामीण भागात अशा स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांना नवी दिशा मिळत असल्याचे मत व्यक्त करण्यात येत आहे.

# मंद्रूपचा मान उंचावला!-प्रशिक्षक शिवराज मुळे यांना राज्यस्तरीय ‘डायमंड ‘२०२६’ पुरस्कार जाहीर’

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : मुद्रुप येथील यात कोवादो प्रशिक्षण शिवराज मुळे यांना उत्कृष्ट प्रशिक्षक राज्यस्तरीय डायमंड २०२६या प्रतिष्ठेचा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. बहुमान इंग्लिश मीडियम स्टुडन्ट स्पोर्ट्स असोसिएशनच्या बारामती यांच्यावतीने येत्या स्वरा एप्रिल रोजी बारामती येथे प्रधान करण्यात येणार आहे. शिवराज मुळे यांनी तायक्कांदो या क्रीडा प्रक्रियेत उल्लेखनीय कार्य करून अनेक गुणवंत खेळाडू घडवले आहेत व त्यांच्या मार्गदर्शनाखाली तयार झालेल्या विद्यार्थ्यांची राज्य व राष्ट्रीय स्तरावरील विविध स्पर्धेमध्ये यश मिळवून मंद्रूप चे नाव उज्वल केले आहे. त्यांच्या सातच्या पूर्ण मेहनतीची व क्रीडा प्रेमींची दखल घेत हा सन्मान जाहीर करण्यात आला आहे.



या पुरस्काराच्या घोषणेमुळे मंद्रूप परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून क्रीडा क्षेत्रातील मान्यवर विद्यार्थी व पालकाकडून त्यांच्यावर अभिनंदन आणि वर्षा होत आहे. आगामी काळातही शिवराज मुळे अधिकारी खेळाडू घडवून क्रीडा क्षेत्रात भरीव योगदान देतील अशी अपेक्षा व्यक्त होत आहे यावेळी दक्षिण सोलापूर फोटोग्राफर असोसिएशनचे अध्यक्ष आणि दक्षिण सोलापूर पत्रकार संघाचे उपाध्यक्ष अशोक सोनकठले यांच्याकडून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आले आहे.

# सिने-नाट्य सांस्कृतिक गुढी चा पहिलावहिला कलावंत मेळावा दिमाखात संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई/केतन भोज : नुकताच सिने-नाट्य सांस्कृतिक गुढी चा पहिलावहिला कलावंत मेळावा राशी स्टुडिओ, माने वखार, करीरोड, मुंबई १२. या ठिकाणी प्रसिद्ध सिने-नाट्य कलावंत, दिग्दर्शक, तंत्रज्ञ, निर्माते यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. हा मेळावा एकत्रितरीत्या साजरा करण्यामागे उद्देश एवढाच होता कीं तळागाळातील सर्व कलावंतांनी एकत्र यावे, विचारांची देवाणघेवाण व्हावी, त्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा शिवाय एकमेकांच्या भेटीगाठी होऊन कामासंदर्भात चर्चा होईल आणि प्रत्येक कलावंताला त्याच्या हाताला काम मिळेल. या मेळाव्याचे आयोजन सर्वश्री दिलीप दळवी, डॉ.किशोर खुशाले, अनिल सुतार, महेश्वर तेटांबे, शीतल माने-शेळके आणि सिद्धी कामथ यांनी केले. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणुन महाराष्ट्र बाजारपेठचे संस्थापक,अध्यक्ष डॉ.कौतिक दांडगे, प्रसिद्ध नृत्यदिग्दर्शक सदानंद राणे, प्रसिद्ध हास्य अभिनेते कांचन पगारे आदी मान्यवर उपस्थित होते. या मेळाव्यात अनेक कलावंतांनी सहभाग घेऊन आपली कला सादर केली त्यात प्रामुख्याने लावणी नृत्य, एकपात्री अभिनय, नाट्य प्रवेश, कराओके गायन आणि खास करून प्रसिद्ध नृत्य दिग्दर्शक अनिल सुतार यांनी स्व.शाहीर दादा कोंडके यांच्या गीतांवर केलेलं नृत्य आणि प्रसिद्ध वादक कलावंत डॉ.किशोर खुशाले यांनी काही निवडक वाद्यांची माहिती आपल्या कल्पकतेने मांडून रसिकांची वाहवा मिळवली. प्रसिद्ध अभिनेत्री सिद्धी कामथ यांनी या संपूर्ण कार्यक्रमाचं सूत्रसंचालन आपल्या मधाळ आणि रसाळ वाणीने करून रसिक प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केलं. आणि महेश्वर भिकाजी तेटांबे यांनी जमलेल्या सर्व कलावंत, अतिथी यांचे आभार मानले. हा पहिलावहिला कलावंत यशस्वी करण्यासाठी सिद्धी कामथ आणि शीतल माने-शेळके यांनी विशेष मेहनत घेतली. त्याचप्रमाणे या मेळाव्यासाठी सर्वश्री.अरविंद घेवडे, प्रमोद मोहिते, आबा पेडणेकर, शंकर पिसाळ, अविनाश राऊत, उदय साटम यांनी सर्वतोपरी सहकार्य केलं. अशा तऱ्हेने कलावंतांच्या उत्साहात पहिलावहिला कलावंत मेळावा जोशात आणि दिमाखात संपन्न झाला.







### इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभागाच्या वतीने आयोजन

### ‘अँप्टीक्वीष्ट’ व ‘सर्किट क्लेश’ या स्पर्धांचे आयोजन

# स्वेरी मध्ये ‘पॉवर प्रवाह २०२६’ हा तांत्रिक उपक्रम उत्साहात संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) च्या इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभागाच्या वतीने ‘पॉवर प्रवाह २०२६’ या राष्ट्रीय स्तरावरील तांत्रिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

स्वेरीचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली, कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम. पवार यांच्या सहकार्याने, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार व इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगचे विभागप्रमुख डॉ. चित्रसेन मैतई यांच्या नेतृत्वाखाली या तांत्रिक उपक्रमाचे आयोजन केले होते. यामध्ये ‘अँप्टीक्वीष्ट’ व ‘सर्किट क्लेश’ या स्पर्धांचे आयोजन दि.२३ मार्च २०२६ रोजी करण्यात आले होते तसेच विद्यार्थ्यांमध्ये नवसंकल्पना व तांत्रिक कौशल्य विकसित करण्यासाठी सलग २४ तासांची हॅकेथॉन स्पर्धा देखील दि.२४ मार्च ते दि.२५ मार्च या दोन दिवशी आयोजित करण्यात आली होती. कार्यक्रमाच्या उदघाटन समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून पंढरपूर महावितरणचे कार्यकारी अभियंता संजय चंद्रकांत शिंदे व गव्हर्मेंट कॉन्ट्रॅक्टर कल्पक देशमुख हे लाभले. त्यांनी आपले विचार व्यक्त करताना ‘अशा परिसंवादामध्ये विद्यार्थी सहभागी झाल्यावर भविष्यात कसा फायदा होणार आहे ? हे सांगितले. याबरोबर अशा परिसंवादाचा विद्यार्थ्यांच्या जडण घडणीमध्ये मोठा वाटा आहे असे सांगून विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. या उपक्रमांतर्गत झालेल्या स्पर्धांच्या पारितोषक वितरणासाठी प्रमुख पाहुणे म्हणून आयईआय सोलापूर लोकल चॅप्टरचे सचिव ओमप्रकाश दरक हे उपस्थित होते. दरक हे एक अनुभवी आर्किटेक्चर व स्ट्रक्चरल इंजिनिअर असून त्यांचे अभियांत्रिकी क्षेत्रात मोठे योगदान आहे. पारितोषिक वितरण प्रसंगी उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार यांनी आपले विचार व्यक्त करताना सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. पुढील वर्षी होणाऱ्या ‘पॉवर प्रवाह २.०’मध्ये असाच सहभाग नोंदवावा असे मत त्यांनी व्यक्त केले. दरक यांनी ’अप्लाईड नॉलेज इज पॉवर’ असा प्रेरणादायी संदेश देत डॉ.बी.पी. रोंगे सरांचे खंबीर नेतृत्व असल्यामुळे अशा प्रकारच्या परिसंवादाचे यशस्वीरीत्या आयोजन होऊ शकते असे सांगत विद्यार्थ्यांचे भविष्य उज्वल व प्रेरणादायी बनविण्यासाठी शुभेच्छा दिल्या. स्पर्धेत प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाने विजेत्या ठरलेल्या स्पर्धकांना बक्षिसे, सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र देऊन पाहुण्यांच्या हस्ते गौरविण्यात आले. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी उस्फुर्तपणे सहभाग नोंदवत आपले तांत्रिक कौशल्य सादर केले. यामध्ये महाराष्ट्रातील जवळपास २५० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभागातील प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी या उपक्रमाचे यशस्वी आयोजन केले. यावेळी स्वेरीचे माजी विद्यार्थी व उद्योजक असलेले श्रेयस पावर सोल्युशनचे संस्थापक श्रेयस कुलकर्णी, स्वेरीच्या परीक्षा विभागाचे प्रमुख डॉ.एस. ए. लेंडवे, इन्फ्रास्ट्रक्चर अधिष्ठाता डॉ.डी.ए. तंबोळी, प्लेसमेंट विभागाचे अधिष्ठाता प्रा. ए.ए. मोटे, सर्व अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून प्रा. सागर चौगुले यांनी काम पाहिले. सूत्रसंचालन सानिका बागल व समीक्षा गटकळ यांनी केले तर विभागप्रमुख डॉ.चित्रसेन मैतई यांनी आभार मानले.

